# न्यूनतम नाण्याची सहभागिता

## सन १९५६ पासून





# न्याय, शांतता आणि समेट यांसाठी आपल्या न्यूनतम नाण्याच्या अर्पणांसह सत्तर वर्षांची प्रार्थना.

**२०२६ न्यूनतम नाण्याची एकत्रित अर्पण उपासना विधी**

न्यूनतम नाण्याच्या एकत्रित अर्पण उपासनेसाठी आंतरराष्ट्रीय समिती (आय. सि. एफ. एल. सि.) यांच्या वतीने हा एक मार्गदर्शक नमुना म्हणून सादर करण्यात आला आहे.

या उपासनेत स्थानिक महिला गटांना आणि मंडळ्यांना त्यांच्या स्थानिक परिस्थिती व गरजांनुसार स्तोत्रे, भजने आणि इतर उपासना-विधी निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. तसेच, सहभागी होण्यासाठी विविध माध्यमांचा वापर करता येईल; उदाहरणार्थ, नाट्यरूप सादरीकरण, संदेश, दृक्-सादरीकरण, लहान गटांमधील चर्चा इत्यादी.

अधिकाधिक सहभागास प्रोत्साहन मिळावे आणि सर्जनशीलतेला वाव मिळावा, यासाठी या उपासना विधीमध्ये विविध व्यक्तींना नेतृत्वाची संधी देण्यात आली आहे. तसेच, विविध सहभागींचे विचार, अनुभव आणि आवाज यांना स्थान देण्याची मुभा ठेवण्यात आली आहे.

न्यूनतम नाण्याची एकत्रित अर्पण उपासना विधी दरवर्षी जुलै महिन्यात प्रकाशित करून वितरित करण्यात येतो, जेणेकरून दरवर्षी सप्टेंबर महिन्यात पारंपरिकरित्या आयोजित करण्यात येणाऱ्या न्यूनतम नाण्याची एकत्रित अर्पण उपासनेसाठी तो वेळेवर उपलब्ध होईल.

तसेच, प्रादेशिक सार्वत्रिक ख्रिस्ती सहकार्य संस्था, विविध पंथीय सहकारी संस्था, महिला गट आणि स्थानिक मंडळ्या यांना त्यांच्या गरजा व परिस्थितीनुसार वर्षभरात कोणत्याही योग्य वेळी एकत्रित अर्पण उपासना आयोजित करता यावी, हा देखील या उपक्रमाचा उद्देश आहे.

**२०२६ हे वर्ष न्यूनतम नाण्याच्या स्थापनेच्या ७० व्या वर्धापन सोहळ्याची सुरुवात करणारे वर्ष आहे.**

**"न्याय, शांतता आणि समेट यांसाठी आपल्या 'न्यूनतम नाण्याच्या' अर्पणांसह सत्तर वर्षांची प्रार्थना."**

आजच्या काळात पर्यावरणीय संकट अधिकाधिक गंभीर होत आहे; तसेच युद्धे, संघर्ष आणि स्त्री हत्येसारख्या गंभीर समस्या वाढत आहेत. न्यूनतम नाणे च्या स्थापनेचे स्मरण करताना, या प्रश्नांकडे आपण गांभीर्याने लक्ष देणे आणि त्यांची जाणीव मनात ठेवणे आवश्यक आहे.

अशा परिस्थितीत, "ज्यांच्यावर दुःख ओढवले आहे त्यांच्या आक्रोशाकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन तो ऐकण्याचे—विशेषतः ज्यांचा आवाज जाणीवपूर्वक दाबला जातो आणि जे स्वतःसाठी बोलू शकत नाहीत, जसे की आपले नैसर्गिक पर्यावरण आणि प्राणी—त्यांच्या वेदनांचा आवाज ऐकण्याचे" आव्हान आपल्यासमोर आजही आहे.

म्हणूनच, न्याय, शांतता आणि समेट यांसाठीच्या आपल्या प्रार्थनांसोबत आपले 'न्यूनतम नाणे'चे अर्पण बाजूला ठेवण्याची आणि एकमेकांसोबत विश्वासूपणे प्रार्थना करण्याची आपली बांधिलकी आपण नव्याने दृढ करीत आहोत.

आंतरराष्ट्रीय समिती (आय. सि. एफ. एल. सि.) यांना एकत्रित अर्पण उपासना विधीबाबतचे आपले अभिप्राय, तसेच आपल्या उपासना सेवेशी संबंधित वैयक्तिक अनुभव, आठवणी, कथा आणि छायाचित्रे मिळाल्यास आम्हाला अत्यंत आनंद होईल. कृपया आपले अभिप्राय व अनुभव पुढील ई-मेल पत्त्यावर पाठवावेत: icflcph@gmail.com

प्रिय एफ. एल. सि. सहकारी, मित्रमैत्रिणींनो आणि सहभागी बांधवांनो, आपल्यासाठी ही उपासना प्रेरणादायी, अर्थपूर्ण आणि आत्मिकदृष्ट्या समृद्ध करणारी ठरो, अशी आम्ही प्रार्थना करतो. शक्य तितक्या सर्जनशील पद्धतीने या उपासनेत सहभागी व्हा आणि या आनंदमय सोहळ्याचा मनःपूर्वक आनंद घ्या!

---

# न्यूनतम नाण्याची सहभागिता @७०

### आपल्या न्यूनतम नाण्याच्या अर्पणांसह ७० वर्षांची प्रार्थना

### न्याय, शांतता आणि समेट यांसाठी

आज, आपण एफ. एल. सि च्या ७० व्या वर्षाचा उत्सव पुढेही साजरा करीत आहोत—न्याय, शांतता आणि समेट यांसाठी आपल्या न्यूनतम नाण्याच्या अर्पणांसह केलेल्या सत्तर वर्षांच्या प्रार्थनेचा!

आणि या उत्सवासाठी आपल्याकडे अनेक कारणे आहेत. त्यापैकी एक कारण म्हणजे आपण स्वतः— आपली उपस्थिती, आपला सहभाग आणि आपली विश्वासू बांधिलकी!

चला, आपण या वर्तुळात एकत्र येऊया आणि ७० वर्षांच्या विश्वासू सहप्रवासाबद्दल, देवाच्या साथ-संगतीबद्दल आणि त्याने दिलेल्या आशीर्वादांबद्दल स्तुती व कृतज्ञता अर्पण करूया. तसेच, येणाऱ्या पुढील ७० वर्षांसाठीही आपली बांधिलकी दृढ करूया—

अखंड प्रार्थना करण्याची, उदार अंतःकरणाने आपले एफ. एल. सि. चे अर्पण बाजूला ठेवण्याची आणि एफ. एल. सि. च्या माध्यमातून देवाकडून मिळणारे अनपेक्षित व अद्‌भुत आशीर्वाद कृतज्ञतेने स्वीकारण्याची!

## स्तुती व कृतज्ञतेचा जयघोष

“हॅलेलुया” (कॅरिबियन)

## उत्सवाचे कृतज्ञता-उद्गार

*(उपासना संचालक प्रत्येक गटातील व्यक्तींना काही क्षण थांबून विचार करण्यास, आठवणी जागविण्यास आणि अंतःकरणातून प्रेरणा मिळेल त्याप्रमाणे आपले विचार मोठ्याने व्यक्त करण्यास आमंत्रित करू शकतात.)*

**५० वर्षांखालील महिलांसाठी:**
आज न्यूनतम नाणे संदर्भात तुम्ही कोणत्या गोष्टीचा उत्सव साजरा करता किंवा कोणत्या गोष्टीबद्दल कृतज्ञ आहात?

**५० वर्षांवरील महिलांसाठी:**
न्यूनतम नाणे ही जगासाठी कोणती देणगी आहे, असे तुम्हाला वाटते?

**युवक-युवतींसाठी (३५ वर्षांखालील):**
न्यूनतम नाणे च्या पुढील ७० वर्षांसाठी तुमचे आव्हान किंवा स्वप्न काय आहे?

**सर्व पुरुष आणि मुलांसाठी:**
न्यूनतम नाणे चे नाव ऐकल्यावर किंवा न्यूनतम नाणे विषयी बोलताना तुमच्या मनात किंवा हृदयात सर्वप्रथम कोणता विचार येतो?

---

# आपण न्याय, शांतता आणि समेट यांसाठी प्रार्थना का करतो?

**आणि त्यासोबत आपले 'लिस्ट कॉईन'चे अर्पण का करतो?**

*(पर्यायी कृती: न्यूनतम नाण्याची इतिहासकथा/प्रवासकथा वाचावी किंवा नाट्यरूपाने सादर करावी— परिशिष्ट पहा.)*

## वाचन :

न्यूनतम नाण्याची संकल्पना भारतातील **शांती सोलोमन** यांना देवाकडून प्राप्त झालेल्या एका दृष्टांतातून उदयास आली. शांती या पॅसिफिक मिशन टीमच्या सदस्य होत्या. १९५६ मध्ये विविध देशांतील सात महिलांचा हा गट आशियातील विविध भागांत प्रवास करण्यासाठी निघाला होता. या मिशनचे आयोजन अमेरिकेतील प्रेस्बिटेरियन चर्च ऑफ द युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका **(PCUSA)** मधील महिलांच्या वतीने **डॉ. मागरिट शॅनन** यांनी केले होते.

या मिशनदरम्यान, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अत्याचार आणि आघात सहन केलेल्या आशियाई महिलांच्या शांती यांनी व्यथा आणि अनुभव ऐकले. त्या काळात भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यातील प्रतिकूल राजनैतिक संबंधांमुळे शांती यांना दक्षिण कोरियाचा व्हिसा नाकारण्यात आला. त्यामुळे त्या फिलिपिन्समध्येच थांबल्या आणि त्यांनी आपल्या अनुभवांबद्दल तसेच ऐकलेल्या महिलांच्या कहाण्यांबद्दल प्रार्थना केली व मनन केले.

**दुसऱ्या महायुद्धानंतर १२ वर्षांनी, १९५६ मध्ये न्यूनतम नाण्याचा जन्म झाला.**

आजही जगाच्या अनेक भागांत युद्धे सुरू असल्याच्या बातम्या आपण ऐकतो. अनेक छावण्यांमध्ये महिला, मुले आणि वृद्ध व्यक्ती दररोज मृत्युमुखी पडत आहेत.

*(उपासना संचालक सहभागी व्यक्तींना वर्तुळाकार उभे किंवा बसण्यास सांगू शकतात. त्यानंतर प्रत्येकाने आलटून-पालटून कृतज्ञतेची एक वाक्यातील प्रार्थना आणि प्रार्थना-विनंती किंवा मनातील चिंता व्यक्त करावी.)*

**कृतज्ञतेच्या प्रार्थनेनंतर मंडळींचा प्रतिसाद:**
**"सर्व आशीर्वादांसाठी देवाची स्तुती व धन्यवाद असोत!"**

**प्रार्थना-विनंती किंवा चिंता व्यक्त केल्यानंतर मंडळींचा प्रतिसाद:**
**"हे प्रेमळ देवा, तुझी दैवी इच्छा पूर्ण होवो!"**

**उपासना संचालक:** *(प्रार्थना समाप्त करताना)*

"हे उदार आणि कृपाळू देवा, तू आम्हाला दिलेल्या सर्व आशीर्वादांसाठी आम्ही तुझे मनःपूर्वक आभार मानतो. आमच्या प्रार्थनांकडे कृपादृष्टीने पाह आणि त्या ऐक! आमचा मित्र व तारणारा येशू ख्रिस्त याच्या नावाने आम्ही प्रार्थना करतो. आमेन!

# शांततेचे क्षण

## जगासाठी प्रार्थना

*(आत्ताच व्यक्त करण्यात आलेल्या सर्व प्रार्थना-विनंत्या आणि चिंतांसाठी एखाद्या सहभागी व्यक्तीस सामूहिक प्रार्थना करण्यास सांगता येईल; किंवा खाली दिलेली प्रार्थना वापरता येईल.)*

## शांततेसाठी प्रार्थना

**हे प्रेमळ देवा,**

अन्याय आणि क्रौर्याविरुद्ध लढताना अर्थपूर्ण परिवर्तन घडवून आणण्यासाठी आम्हाला धैर्य, सर्जनशीलता आणि दृढ विश्वास प्रदान कर.

आमच्यापैकी प्रत्येकाला काहीतरी मोठे किंवा अगदी लहानसे का होईना, पण काहीतरी करण्याचे सामर्थ्य दे.

इतरांच्या दुःखाने व्यथित होणारी आमची अंतःकरणे कधीही संवेदनाशून्य होऊ देऊ नकोस. तसेच, आशेने परिपूर्ण भविष्याबद्दल तू आम्हाला दिलेल्या वचनांची आम्हाला सदैव आठवण करून दे.

येशू, तुझे आभार.

— अनामिक

# अनुभवकथन

*(पर्यायी स्वरूप म्हणून, या उपासनेसाठी विषयाला अनुसरून प्रवचन/ संदेश देता येईल.)*

- "प्रार्थनेची शक्ती" — ईव्हा फिंडले, माजी (आय. सि. एफ. एल. सि.) कोषाध्यक्ष यांच्याकडून.

- नॅन्सी लिन, माजी (आय. सि. एफ. एल. सि.) अध्यक्षा यांच्याकडून अनुभवकथन. *(परिशिष्ट पहा.)*
- किंवा, एफ. एल. सि. च्या एखाद्या प्रकल्पातील लाभार्थी, शिष्यवृत्ती प्राप्तकर्ती किंवा आपत्कालीन अनुदानाच्या भागीदार संस्थेतील प्रतिनिधी हिला आमंत्रित करून, एफ. एल. सि. मुळे तिच्या जीवनावर आणि तिच्या समुदायावर झालेल्या परिणामाविषयी तिचा अनुभव ऐकता येईल. *(अशा व्यक्तीला/प्रतिनिधीला आधीच आमंत्रित करावे.)*

यानंतर: ऐकलेल्या अनुभवांवर आधारित आपले विचार आणि भावना व्यक्त करण्यासाठी काही वेळ देता येईल.

## न्यूनतम नाण्याच्या ची प्रार्थना — सर्वांनी एकसुरात)

## प्रेमळ सृष्टीकर्त्या देवा,

आपल्या अंतःकरणात असलेल्या उत्कट आकांक्षेसाठी आणि अन्यायाबद्दल जाणवणाऱ्या अस्वस्थतेसाठी आम्ही तुझ्या सान्निध्यात मनःपूर्वक कृतज्ञतेने येतो. न्यायासाठी उठणारे आक्रोश ऐकण्यासाठी कान, पीडितांच्या दुःखाशी एकरूप होण्यासाठी संवेदनशील हृदय आणि त्या दुःखाच्या निवारणासाठी काहीतरी करण्यासाठी हात-पाय दिल्याबद्दल तुझे आभार.

न्याय, शांतता आणि समेटाच्या या प्रवासात आमच्यासोबत राह**.** जेव्हा आम्ही भयभीत होतो, तेव्हा आमच्या मनातील पूर्वग्रहांना सामोरे जाण्याचे धैर्य आम्हाला शिकव. जेव्हा आम्ही थकून जातो, तेव्हा हळू आवाजात केलेल्या प्रार्थना आणि 'लिस्ट कॉईन'च्या अर्पणांमधून घडणाऱ्या चमत्कारांची आम्हाला आठवण करून दे.

प्रेमळ सृष्टीकर्त्या देवा, तुझ्याप्रमाणे प्रेम करण्यास आम्हाला शिकव आणि ज्या जगावर तू इतके प्रेम करतोस, त्या जगाची नव्याने निर्मिती करण्यासाठी आम्हाला साधन बनव.

आमेन.

---

## आज न्यूनतम नाण्या साठी तुमची प्रार्थना किंवा आशीर्वाद काय आहे?

*(पुढील वर्षांमध्ये न्यूनतम नाण्या साठी तुम्ही कोणती प्रार्थना किंवा आशीर्वाद व्यक्त करू इच्छिता, याचे काही क्षण शांतपणे मनन करा. तुम्हाला हवे असल्यास ते कागदावर लिहून न्यूनतम नाण्याच्या अर्पणांसोबत समर्पणासाठी ठेवता येईल.)*

---

## न्यूनतम नाण्या च्या अर्पणांचे समर्पण व आशीर्वाद

## स्तुतीगीत (Doxology)

**ज्याच्यापासून सर्व आशीर्वाद वाहतात, त्या देवाची स्तुती असो.**
**उच्च-नीच, सर्व सृष्टीतील जीवांनी देवाची स्तुती करावी.**
**येशूमध्ये पूर्णपणे प्रकट झालेल्या देवाची स्तुती असो—**
**सृष्टीकर्ता, वचन आणि एकमेव पवित्र आत्मा. आमेन.**

---

# न्यूनतम नाण्या साठी प्रार्थना

---

# न्यूनतम नाण्या साठी कृतज्ञता व मध्यस्थीच्या प्रार्थना

**उपासना संचालक:**

आपण प्रार्थनेत एकत्र येत असताना, कृतीद्वारे आपल्या विश्वासाची नव्याने जाणीव करून घेऊया. निर्गम १५:२०–२१ मधील हे वचनही आपण स्मरणात ठेवूया:

**२०** अहरोनाची बहीण, संदेष्टी मिर्याम हिने हातात डफ घेतला आणि सर्व स्त्रिया डफ वाजवीत व नाचत तिच्यामागे गेल्या.
**२१** मिर्यामने त्यांना उत्तर दिले, "परमेश्वराचे स्तवन करा; कारण त्याने अतिशय गौरवशाली विजय मिळविला आहे; घोडा आणि त्याचा स्वार त्याने समुद्रात फेकून दिला आहे."

## वाचक १:

हे जिवंत देवा, आम्ही आमच्या पूर्वज माताना स्मरतो. वाळवंटात हाकलून दिलेल्या हागारसाठी, निर्गमाच्या प्रवासातील संदेष्टी व कवयित्री आणि वाळवंटातून मार्गदर्शन करणारी मिर्यामसाठी, तसेच इस्राएलमधील माता आणि न्यायाधीश दबोरासाठी, आम्ही तुझे आभार मानतो.

**सर्वजण:** हे देवा, आम्ही तुझे आभार मानतो.

## वाचक २:

आम्ही त्या स्त्रीचे स्मरण करतो, जिने आपल्या अश्रूंनी येशूचे पाय धुतले. विहिरीजवळील शमरोनी स्त्रीचे स्मरण करतो—जिने सर्वप्रथम शुभवर्तमानाचा संदेश इतरांपर्यंत पोहोचविला. तसेच, पुनरुत्थानाची साक्ष देणारी पहिली प्रेषित, मरीया मग्दालिनी हिचेही स्मरण करतो.

**सर्वजण:** हे देवा, आम्ही तुझे आभार मानतो.

---

## वाचक ३:

आम्ही त्या स्त्रीयांचे स्मरण करतो, ज्यांनी हे ओळखले की विश्वासाचे जीवन जगणे म्हणजे कृतीद्वारे त्याला प्रतिसाद देणे होय. अज्ञात आणि अनिश्चित परिस्थितींना विश्वासाने सामोरे गेलेल्या आणि भीतीचा सामना धैर्याने केलेल्या त्या सर्व स्त्रीयांचे आम्ही स्मरण करतो.

**सर्वजण:** हे देवा, आम्ही तुझे आभार मानतो.

---

## वाचक ४:

पुढे येऊन नेतृत्व करण्याचे धाडस केलेल्या, एकट्याने उभे राहण्याचा धोका पत्करलेल्या आणि समाजातील रूढ समजुतींना व रूढ चौकटींना आव्हान दिलेल्या सर्व स्त्रीयांसाठी आम्ही तुझे आभार मानतो.

आम्ही ...यांच्यासाठी तुझे आभार मानतो.
*(क्षणभर स्मरण करा आणि आपल्या देशातील व समुदायातील ज्या स्त्रीयांची नावे तुम्हाला घ्यावीशी वाटतात, ती मोठ्याने घेऊ शकता.)*

**सर्वजण:** हे देवा, आम्ही तुझे आभार मानतो.

---

## वाचक ५:

इतिहासात सुधारणांसाठी संघर्ष केलेल्या आणि आपल्या काळातील वंचित व उपेक्षित लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सेवाकार्य करण्याचा प्रयत्न केलेल्या स्त्रीयांचे आम्ही स्मरण करतो.

तसेच, ज्यांचे चेहरे आणि नावे आपल्याला माहीत नाहीत, परंतु ज्यांच्या कार्यामुळे पृथ्वीवर 'शालोम'—शांतता, सलोखा आणि परिपूर्ण कल्याण—स्थापित करण्याच्या तुझ्या संकल्पनेची पूर्तता होण्यास हातभार लागला, अशा स्त्रीयांचेही आम्ही स्मरण करतो.

**सर्वजण:** हे देवा, आम्ही तुझे आभार मानतो.

---

**सर्वजण:** हे पवित्र आणि आम्हाला आधार देणाऱ्या देवा,
त्यांच्या धैर्याचा आणि दूरदृष्टीचा वारसा स्वीकारण्यास आम्हाला योग्य बनव. तुझ्या कन्या आणि पुत्र म्हणून आम्हाला पुन्हा एकदा आव्हान दे. पवित्र आत्म्याच्या कृपेद्वारे प्रेमाच्या च्या अधिक जवळ आम्हाला घेऊन जा.

आमेन.

---

# बांधिलकीचे गीत

## "देवा, तू आम्हाला जे दिले आहे ते आम्ही पाहतो"

*("स्तव तुझा करू द्यावा" या चालीवर)*

देवा, तू दिलेले आम्ही पाहतो,
कृपेची चिन्हे सर्वत्र दिसती;
चोहीकडे स्वर्गीय देणग्या,
सर्वांसाठी पुरेशा असती.
तुझ्या संपत्तीचे आम्ही विश्वस्त,
जसे मिळाले तसे देण्यास बोलाविले;
तुझे आशीर्वाद विपुल मिळाले,
ज्या दिवसापासून विश्वास धरला.

तू स्वर्गातून पाठविलेल्या
समृद्धीचे आम्ही विश्वस्त आहोत.
ख्रिस्तामध्ये तू महिमा त्यागून
नम्रतेने तुझे प्रेम दाखविले.
गोठ्यात—स्वर्गीय देणगी म्हणून!
क्रूसावर—प्रेम आणि वेदनेत!
आम्हाला क्षमा मिळाली, हे तू घोषित केलेस;
आता तुझ्या नावाने आम्हाला पाठवितोस.

**पवित्र शास्त्र मधील संदर्भ:** स्तोत्रसंहिता १४८, २२, १००, १५०; लूक १:४६–५५

---

# सामुदायिक प्रार्थना

## **“देवा, तू आम्हाला जे दिले आहे ते आम्ही पाहतो”**

*(“ स्तव तुझा करू द्यावा” या चालीवर)*

ख्रिस्त पुत्राद्वारे तू दाखविलेल्या
आदरातिथ्याचे आम्ही विश्वस्त आहोत.
त्याच्या जीवनातून, शिकवणुकीतून,
येशूने सर्वांचे स्वागत केले.

बहिष्कृतांना आणि परक्यांना
त्याने प्रेमाने आश्रय दिला;
तुझ्या आत्म्याद्वारे आम्हालाही
मिळालेल्या स्वागताचा स्वीकार इतरांना देऊ दे.

आम्ही विश्वस्त म्हणून पाठविलेले,
तुला आमचे सर्वोत्तम अर्पण करणारे.
आमच्या सेवेतून, काळजीतून
मिळालेल्या आशीर्वादाप्रमाणे आम्ही देऊ दे.
प्रेमळ देवा, विश्वासूपणे जगणे
केवळ रविवारच्या बोलण्यापुरते मर्यादित राहू नये.
आम्हाला प्रेम करण्यास, सेवा करण्यास, देण्यास पाठव;
दररोज तुझ्या मार्गावर चालण्यास आम्हाला साहाय्य कर!

.

## **सर्वजण:** प्रभूची प्रार्थना

# समारोपाचा आशीर्वाद

## देवाच्या अढळ शांततेत पुढे जा.

या जगाच्या जखमांतून धैर्याने मार्गक्रमण करा,
विदीर्ण झालेल्या ठिकाणी करुणेने मलम लावा,
आणि कोणताही द्वेष विझवू शकणार नाही
असा प्रकाश आपल्या अंतःकरणात जपा.

जिथे जिथे युद्ध धुमसत आहे,
जिथे जिथे अन्याय अधिक बळावत आहे,
जिथे जिथे विभाजनामुळे हृदये कठोर होत आहेत—
तिथे तिथे देवाच्या सलोख्याचे रक्षक म्हणून पुढे जा.

आपले जीवन हे याची जिवंत साक्ष ठरो की,
**शांतता शक्य आहे,**
**समेट हा सूडापेक्षा अधिक सामर्थ्यवान आहे,**
**आणि उपचार व पुनर्स्थापना ही संपूर्ण मानवकुळाची जबाबदारी आहे.**

हेच आपल्या काळाचे कार्य आहे,
आणि ते आपल्या सर्वांचे आहे.

**आमेन.**

---

**-:मराठी भाषांतर :-**

मानसी इनामदार

सिनॉडिकल एफ. एल. सि.कनव्हनर

सि**.**एन**.** आय**.**

---